ISSN2278-5914


Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No. Maharashtra/13482/Satara/2010)

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन



२७. १८५७ च्या उठावाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील पारिणाम १५६
प्रा.डॉ.चंपाताई श्रीरंग बोधले
२८. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य (इ.स. १८७३ ते १९४४) १६०
कु.प्रतिभा गुलाब मोरे
२९. छ.राजर्षी शाहू महाराज यांचे औद्योगिक धोरण : एक आढावा. १६५
प्रा.एस.एस काशिद
प्रा.सी.पी.गायकवाड
३०. सातारा जिल्हा लोकल बोर्डातील लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे कार्य १६८
प्रा.डॉ.संतोष तुकाराम कदम
३१. कोल्हापूर - कित्तूर संबंध १७२
प्रा.डॉ.सौ.वंदना रामचंद्र लोंढे
३२. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान प्रस्तावना १७६
प्रा. लता दिगंबर आंदे
**33. Nature And Classification of AIDS and Tuberculosis Diseases In Satara District(MS) : A Geographical Analysis 182**
**Mr. Santosh Prakash Patil**
**Prof. C. U. Mane**
३४. अहमदनगर शहरातील विडी कामगारांची घरकुल योजना १९१
प्रा.गणेश शंकर विधाटे
३५. स्त्रीवादी दृष्टीकोनातून गावगाड्यातील लोहार स्त्रीयांचे स्थान १९७
डॉ.संघमित्रा वि.सरवदे
३६. माण तालुक्यातील पर्यटन एक ऐतिहासिक अभ्यास २०१
प्रा. के.एस. शिंदे
प्रा. डि.के.रसाळ
३७. इतिहास संशोधन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन : एक दृष्टिक्षेप २०७
प्रा.शशिकांत महादेव मोहिते
३८. इतिहास लेखन आणि इतिहास संशोधनासमोरील आव्हाने २१४
प्रा.विनोद सखाराम बोरकर
३९. इतिहास लेखनासमोरील आव्हाने २१९
प्रा.एम्.डी. चिंदे

# ३५. स्त्रीवादी दृष्टीकोनातून गावगाड्यातील लोहार स्त्रियांचे स्थान


डॉ.संघमित्रा वि.सरवदे
मा.अण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले,
जि.कोल्हापूर


आजच्या काळात खेड्यातील गावगाडा मोडकळीस आलेला आहे असे जरी वाटत असले तरी गावगाड्यातील जातीजातीतील परस्पर संबंध हे थोड्याफार फरकाने आजही परंपराधिष्ठीत व जाती व्यवस्थेवरच आधारित आहेत. स्त्रिया या जातीजातींमध्ये विभागल्या गेल्या आहेत. या स्त्रियांच्या अधिकारकक्षा, वय, प्रतिष्ठा जातीनुसार ठरत असतात. गावगाड्यातील स्त्रियांच्या संदर्भात जातीनुसार ठरणाऱ्या त्यांच्या अधिकार कक्षा गावाच्या सार्वजनिक व सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण योगदान देतात. इतिहासाने याची दखल आजपावतो घेतलेली दिसत नाही. बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार हे गावाचा अविभाज्य घटक होते.

**लोहार :** शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा या बलुतेदाराचा संबंध ऐरण, हातोडा, सांडशी, घण व भात्याशी असतो. तो लग्न समारभांत नवरदेवासाठी नवी कट्यार बनवून देतो. लोहाराने स्वत:हून अशी कट्यार देणे हा मानाचा एक भाग समजला जातो. त्याचा मोबदला व सन्मानाचे प्रतिक म्हणून शेला पागोटे दिले जाते. लोखंडाला आकार देणारा हा प्राचीनतम कलाकार असावा, असे मानवी उत्क्रांतीच्या इतिहासावरुन वाटते.[१]

लोहार, गाडी लोहार, राजपुत लोहार आणि घिसाडी या लोहाराच्या प्रमुख पोटजाती होत. गाडी लोहार भटक्या जमातीमध्ये तर लोहार यांस इतर जातीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेले आहे.[२] लोहार समाजातील रीतिरिवाज, सण उत्सव वेगळे नाहीत. मात्र कष्टाचे काम करणाऱ्या या समाजात दारूचे व्यसनही बरेच आहे. पुर्वी तर विवाहाचे प्रसंगी देवाला बोकड आणि दारूचा नैवेद्य दाखविण्याची प्रथा होती.[३]

**बलुतेदारांची वर्गवारी :** बलुतेदारांच्या कामाच्या स्वरुपावरून व त्यांच्या कामाच्या महत्त्वाच्या स्थानावरुन त्यांच्या ओळी अथवा वर्ग बनले आहेत. कुणबी किंवा शेतकरी हा गाय असून बलुतेदार ही त्याची वासरे आहेत, असे मानले जाते.

जास्त उपयोगी पहिली ओळ अथवा कास–महार, मांग, चांभार व सुतार यांची होय! या

बलुतेदारांना १० च्या प्रमाणात बलुते दिले जात असे. मधल्या कासेचे-न्हावी, कुभांर परीट लोहार होते तर धाकट्या कासेचे अथवा तिसऱ्या ओळीचे जोशी, गुरव, कोळी आणि सोनार होते.[४]

हंगामात ठरलेल्या प्रमाणात धान्य देणे, पेंडी काडी देणे, खळे देणे, विधी सोहळ्यात त्यांचे मानपान देणे असे त्या बलुत्याचे स्वरुप होते. बलुत्याचा निरख हा बलुतेदाराला पोटापुरता मिळेल आणि त्याची उपासमार होणार नाही अशा आणि एवढ्याच पद्धतीने ठरलेला होता.[५]

**लोहार स्त्रीचे गावगाड्यातील स्थान :** गावगाड्यातील लोहार स्त्रियांना घरकाम, नवऱ्याच्या हाताखाली काम व मजुरी अशी कामे करावी लागत. त्यांना कोळसा आणून देणे, भाता ओढणे, घण घालण्याची कामे आणि बैलगाडीच्या चाकाची धाव बसविण्यासाठी शेणकुट आणून देणे, त्यासाठी दुरवरुन पाणी आणणे अशी कामे करावी लागत.

विळा, खुरपी यांच्या मुडीच्या समोरील बाजूस लोखंडी रिंग असते तिला 'विडी' म्हणत. ही विडी तयार करण्याचे काम स्त्रिया करत. लोखंडी पत्र्याचे तुकडे करुन गोल आकार देणे, जिथे जोड द्यायचा तिथे तांब्याच्या धातूचा तुकडा ठेऊन भात्याच्या इंगळावर ठेवायचे त्याला ताव आल्यावर बाहेर काढायचे, थोडे थोडे थंड झाल्यावर ही विडी मुठीत बसवायचे. विडीच्या जोडासाठी वापरले जाणाऱ्या तांब्यासाठी जुने पितळी अथवा तांब्याच्या ताट वाटीचा उपयोग केला जाई.

या कामाच्या मोबदल्यात वर्षातून एकदाच पुरूष खळ्यावर जाऊन बलुते मागत असत. नांगर, कुळव तयार केल्यानंतर डाळ, गुळ गव्हाचे पीठ, तांदुळ, टॉवेल टोपी व ओटीचे सामान, ब्लाऊज पीस व नारळ हे मानाने दिले जात असे. सण वाटून देण्याची व घेण्याची प्रथा त्यांच्यामध्ये नव्हती. ललिता बाळासो लोहार यांनी त्यांच्या मुलाखतीदरम्यान सांगितले की, या बलुत्यावर उदरनिर्वाह भागत नसे तेव्हा दुसऱ्याच्या शेतावर शेतमजुरीसाठी जावे लागे. इतर पर्याय उपलब्ध नसल्याने त्यांना बलुतेदारी करावी लागत असे.[६]

**लोहार स्त्रियांचे सांस्कृतिक जीवन:** लोहारांच्या पोटजातींमध्ये बेटी व्यवहार होत नाही. या जातीमध्ये पुनर्विवाहाची प्रथा रुढ आहे परंतु, अशा पुनर्विवाहीत स्त्रीचा दर्जा कमीपणाचा असे. शुभप्रंसगी अशा स्त्रियांना मानपान दिला जात नसे या समाजाचे लग्नविधी गुरव समाजामार्फत पार पाडले जात असे. पुर्वी हा लग्नसोहळा पाच दिवस चालत असे. पण हल्ली तो एक-दोन दिवसांत पार पाडला जातो.

लोहार समाजामध्ये जोतिबा, नाईकबा रेणुका, रासुबाई(कोकणातील) ही त्यांची कुलदैवत आहेत. सुताराप्रमाणेच लोहार देखील विश्वकर्म्याची जयंती साजरी करतात. ते हिंदु धर्मातील सर्व सण उत्सव साजरे करतात. पण गावाच्या सार्वजनिक उत्सवामध्ये त्यांना विशेष मानसन्मान नसे. या समाजात वंश पुढे चालविण्यासाठी मुलगाच पाहिजे, असा आग्रह केला जातो. या समाजामध्ये सटवाई पुजणे, बारसे घालणे हे विधी केले जातात. मुलगी वयात आल्यावर पेहराव

ग्रामीण भागातील इतर महिलांसारखाच आहे. पण त्या आडवे कुंकच लावतात.

या स्त्रिया गावगाड्यातील इतर खालच्या जातीतील स्त्रियांचा बाट पाळत. मुलाखतीदरम्यान रंजना लोहार यांनी सांगितले की, खालच्या जातीच्या स्त्रियांना चहा पिण्यासाठी वेगळी वाटी ठेवत असत.[७] वरिष्ठ जातीतील स्त्रिया मात्र लोहार स्त्रियांना हीन दर्जाची वागणूक देतात. त्यांच्यासाठी या वरिष्ठ जातीतील स्त्रिया वेगळी वाटी ठेवत. परंतु हल्ली ही प्रथा बंद झाली आहे. या समाजामध्ये मांसाहाराचे प्रमाण मोठे आहे.

**स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून लोहार स्त्रियांची चिकित्सा :** गावगाड्यात वतन परंपरा, बुलत्याची पद्धती व जातीव्यवस्था याची घट्ट वीण पहावयाला मिळते या तीन घटकांचा स्त्रियांच्या जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. वर्ग जाती व लिंगभाव या कसोट्यांच्या आधारावर गावगाड्यातील स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध घेता येतो.

पुरूषप्रधानता ही लिंगाधारित श्रमविभागणी करते तर जातीव्यवस्था जातिधारित श्रमविभागणी करते. या स्त्रियांच्या अनुभवांचे विश्लेषण करण्यासाठी स्त्रीवादी इतिहासलेखनाला लिंगभाव या कोटीक्रमाची गरज भासते. स्त्रियांचे कर्तेपण अधोरेखित करणाऱ्या घटितांना प्रकाशात आणणे. म्हणनू स्त्रियांचे जीवन ज्या मुल्यव्यवस्थांनी प्रभावित झाले अशा मुल्यव्यवस्थांची चिकित्सा करावी लागेल. (इतिहास लेखन मिमांसा लोकवाङमय गृह, मुंबई पहिली आवृती मार्च २०१०, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड१, पृ.१३६)

स्त्री व तिची सामाजिकता यांचे विश्लेषण करण्यास स्त्रीवादी इतिहास लेखनाने विशेष महत्त्व दिले आहे. भारतीय इतिहासातील स्त्रियांची बेदखलता नष्ट करणे, स्त्रियांवरील अत्याचार, स्त्रियांचे शोषण इतिहासात मांडणे, स्त्रियांच्या कर्तबागारीला अधोरेखित करणे आणि लिंगभावात्मक जडणघडणीतून इतिहसाची जाणीव आकारला आणणे अशी स्त्रीवादी इतिहसालेखनाची उद्दिष्टे सांगता येतील. ही सर्व उद्दिष्ट्ये गावगाड्यातील स्त्रियांच्या इतिहासलेखन करताना पुर्ण करू शकतात.

**निष्कर्ष :** गावगाड्यातील लोहार स्त्रियांचा शोध घेत असताना या स्त्रिया आपल्या जातीनुसार कर्म करतात. आपली पायरी संभाळून राहतात. असे का घडले याची चिकित्सा केली तर त्यांनी तसेच राहिले पाहिजे अशी व्यवस्था धर्मव्यवस्थेने करून ठेवली आहे. रुढी परंपरा कुळाचार व जातकर्म या पलीकडे तिचे जीवन जात नाही. या स्त्रिया जात कर्म व कुळाचारनुसार गावगाड्यातील सार्वजनिक जीवनात आपले कर्म करताना दिसतात.

**संदर्भ :**

१. लुलेकर प्रल्हाद, गावगाड्याचे शिल्पकार, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २००९,पृ.२३
२. कित्ता, पृ.२४

३. कित्ता, पृ.२५
४. कित्ता, पृ.२५.
५. संपा पुंडे द.दि., गावगाडा शताब्दी आवृत्ती, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २०१५, पृ.७८
६. लोहार ललिता बाळासो, मुडशिंगी ता. हातकणंगले जि.कोल्हापूर यांची मुलाखत दि.१३/३/२०१६
७. लोहार रंजना, मुडशिंगी ता. हातकणंगले जि.कोल्हापूर यांची मुलाखत दि.१३/३/२०१६